# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)


आरोग्य भवन, ७ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई - ०१

| | |
|---|---|
| संचालनालय - २२६२१०३१-३६<br>मा.संचालक - २२६२०२९२<br>Website : http://maha-arogya.gov.in<br>Fax No. 022-22620234 (DHS) | सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) - २२६२२०२७<br>उपसंचालक (मौखिक आरोग्य)- २२६२१०३६<br>Email IDs: othp@rediffmail.com,<br>ddhsoral.dhs-mh@gov.in |


जा.क्र.संआसे/रामौआ/ 1359 - 1361 /२०१८. दिनांक:- २६ /१२/२०१८.

प्रति,

मा. अध्यक्ष, विपश्यना विशोधन विन्यास (वि.वि.वि), मुंबई.

विषय:- परभणी जिल्ह्यातील पुर्णा तालुक्यातील कागलगाव येथे विपश्यना व आनापानाच्या मदतीने आंनदी गाव ( HAPPY VILLAGE) करणेची अभिनव योजना राबविणे बाबत.

संदर्भ:- १) शानि क्र अरजा २४०३/२७ सेवा ८ दिनांक २७ जुन २००३
२) शानि क्र बीसीएच-२०१४/प्रक्र ६१/ बांधकामे दि. १६.१२.२०१५ परिशिष्ट क ३.
३) शानि मित्र उपक्रमाचा शालेय शिक्षण विभागाचा संकीर्ण २०११ ( २३६/११) मा शि-३
४) जा.क्र.सआसे/असंसर्ग/ /२०१८ दि.०१.०८.२०१८ चे पत्र.

वरील विषय संदर्भान्वये विनंती करण्यात येते ही वरील गाव हे सुरुवातीला विपश्यना व आनापानाच्या मदतीने तंबाखु मुक्त करण्यासाठी निवडण्यात आले होते पण त्या प्रा आ केंद्रातील, उपकेंद्रातील व गावातील उस्फुर्त प्रतिसाद व उत्साह पाहुन सदर गाव हे आनंदी गाव म्हणुन विकसीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रेरणा प्रकल्पाच्या माध्यमातुनही या गावात योगदान देण्यात येणार आहे.

सध्या या गावातील सुमारे २६ निवासी हे दहा दिवसीय विपश्यना शिबीर करुन आलेले आहेत. व २००० पेक्षा जास्त लोकांनी आनापाना साधना घेतली आहे व ते त्याचा आभ्यास करत आहेत. तसेच आशा, अंगणवाडी ताई, अधिपरीचारीका, प्रा आ केंद्रातील अधिपरीचारीका व वैद्यकीय अधिकारी यांच्या पुढाकाराने निरंतर आनापाना साठीचे वर्ग चालु आहेत. यात सर्व संबंधीतांना म्हणजे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाचे अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हा परीषद व जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी यांनाही यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या योजनेमध्ये दर रविवारीच नाही तर आठवडयातुन दोनदा आनापानाची सत्रे ७०-१०० धम्मसेवक आपल्या विपश्यना विशोधन विन्यास (वि.वि.वि) तर्फे जाऊन घेत आहेत व उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे.

यापुढेही आपल्या मार्गदर्शनाखाली सदर प्रकल्प चालु राहुन महाराष्ट्रातील प्रेरणा प्रकल्पांतर्गत जोखमीच्या गावांमध्ये ही संदर प्रकल्प राबवावा ही नम्र विनंती.

२६।।५।।१८

अतिरीक्त संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई

प्रत- १) उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ.
२) मा. डॉ. संग्राम जोंधळे, सिनीयर असीस्टंट् टिचर, मराठवाडा बाल रुग्णालय, नांदेड.